**MHRG120000282018**

**Reg Dkst/1/2018**

**Raghunath Posha Kamble deceased**
**through his legal heirs**
**Gajanan Raghunath Kambale**
**Vs.**
**Gajanan Ramchandra Kamable**
**deceased through legal heirs**
**1/1Chandrabai Gajanan Kambale**

## निशाणी क्र. ४७ कडील आदेश

प्रस्तुत अर्ज दरखास्तदार यांनी दाखल केला असून अंतीम हुकूमनामा क्र.१/१९९९ मधील हुकूमनाम्याप्रमाणे व निशाणी क्र.२६ कडील अहवाल व नकाशानुसार घर मिळकतीचे वाटप सुचविल्याप्रमाणे बेलीफ मार्फत मिळकतीचा ताबा मिळावा म्हणून दाखल केला आहे.

२. सामनेवाला यांनी निशाणी क्र.४९ कडे पुरसिस दाखल करुन त्यांचे निशाणी क्र.४८ म्हणणे या अर्जासाठी विचारात घ्यावे असे कथन केले आहे. निशाणी क्र.४८ कडील म्हणणे नुसार सामनेवाला यांनी अर्जास आक्षेप घेतला आहे की, अर्ज दाखल करतेवेळी कोणत्याही कायदेशिर बाबीची व मिळकतीच्या आजच्या परिस्थीतीची शहानिशा न करता मोघम अर्ज दाखल केला आहे. सामनेवाला यांचे कथनानुसार त्यांना उपअधिक्षक भूमी अभिलेख, मुरुड यांच्याकडून जमिन मिळकतीची मोजणी करणेबाबत कोणतीही नोटीस आलेली नाही व तशी मोजणी झालेली नाही. ज्या घराचा ताबा बेलिफ मार्फत घेण्याचा आहे त्याचा घर नंबर नमूद केलेला नाही, घराचा असेसमेंट उतारा दाखल केलेला नाही. करिता दरखास्तदार यांचा अर्ज फेटाळण्यात यावा.

३. दरखास्तदार यांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवाला यांचे वकीलांनी त्यांचे म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजण्यात यावा असे निवेदन केले.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात दाखल अंतीम हुकूमनामा क्र.१/१९९९ नुसार दि.०१-०३-२००६ रोजी अंतीम हुकूमनामा करण्यात आला आहे. आदेशातील अनु.क्र.२ नुसार मिळकतीचे वाटप भूमी अभिलेख यांनी निशाणी क्र.६३ कडे सुचविलेल्या वाटपपत्र व नकाशानुसार जिल्हाधिकारी यांचेकडून करण्यात यावे असे आदेश झाले आहेत. आदेशातील अनु.क्र.३ नुसार घर मिळकतीचे वाटप न्यायालयीन आयुक्त यांनी दिलेला अहवाल निशाणी क्र.२६ व त्यासोबतचा नकाशा यानुसार करण्याबाबत आदेश झाले आहेत.

५. अंतीम हुकूमनामा झाल्यानंतर सामनेवाला यांनी अलिबाग येथील मा. जिल्हा न्यायालयात अपील क्र.९३/२००६ दाखल केल्याचे दिसून येते. सदर अपीलातील न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत यादी निशाणी क्र.४ सोबत दाखल केली आहे. त्यानुसार

सामनेवाला यांचे अपील दि.०४-१०-२०१७ रोजी फेटाळण्यात आले आहे. सदर अपील फेटाळण्यात आल्यानंतर दरखास्तदार यांनी प्रस्तुतची दरखास्त दि.०१-०२-२०१८ रोजी दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरणात सामनेवाला यांनी अपील क्र.९३/२००६ मधील न्यायनिर्णय आव्हानित केल्याबाबत अभिलेखावर काहीएक दस्त दाखल केलेला नाही अथवा असे काही अपील दाखल आहे असे म्हणणे दाखल केलेले नाही. यावरुन अपीलातील दि.०४-१०-२०१७ चे आदेश कायम असून प्रस्तुत प्रकरणात कुठलेही स्थगन आदेश नाही. प्रस्तुत प्रकरणातील अंतीम हुकूमनामा मूळ प्रकरण ८/१९८८ मधील असून अंतीम हुकूमनाम्या विरुध्दचे अपील निकाली निघाल्यानंतर प्रस्तुत प्रकरण गेल्या पाच वर्षापासून हुकूमनामा अंमलबजावणीसाठी प्रलंबित आहे.

६. उपरोक्त चर्चा विचारात घेता दरखास्तदार यांचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. करीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. दावा घर मिळकतीचे वाटपासाठी अंतिम हुकूमनामा व त्यासोबत निशाणी क्र.२६ चा अहवालानुसार बेलीफा मार्फत वॉरंट काढण्यात यावे.

३. दरखास्तदार यांनी घर मिळकतीचा असेसमेंट उतारा, निशाणी क्र.२६ च्या अहवालाची प्रत इत्यादी आवश्यक कागदपत्रांच्या प्रती सादर कराव्यात.

स्वाक्षरी/-
(घनःशाम रा.तिवारी)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
मुरूड, ता. रायगड-अलिबाग

दिनांक : २०-०९-२०२५